ठाणे जिल्हा

भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

काय आहे निधी मागणी-वितरण व्यवस्था? कशी राबवली जाते ही योजना?

अमृत आहार योजना आदिवासी विकास विभागाचा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून आदिवासी विभागाने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांना पाकीटबंद आहार (टीएचआर) बंद करून शिजवलेला ताजा चौरस आहार आठवड्यातून पाच दिवस देणे आणि ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी किंवा केळी देणे हे या योजनेचे खास वैशिष्ट्य आहे. त्यामुळे आदिवासी समाजातील स्त्रियांना व बालकांना या योजनेचा व्यवस्थित लाभ मिळावा व ही योजना अधिक चांगल्या पद्धतीने कार्यान्वित व्हावी म्हणून ग्रामसभा व विकेंद्रीकरणाच्या माध्यमांतून या योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करण्याचेही निर्देश या शासन निर्णयातून देण्यात आले आहेत.

भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची पार्श्वभूमी

अनुसूचित क्षेत्रातील आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त असून आदिवासी समाजामध्ये याचे प्रमाण ३३.१ टक्के एवढे आहे. आदिवासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजन वाढीचे प्रमाण कमी असल्यामुळे त्याचा परिणाम बाळाच्या वजनावर होऊन कमी वजनाची बालके जन्माला येतात. असे अनेक अभ्यास व संशोधनातून सिद्ध झाले आहे. तसेच बालक जन्मानंतर पहिले सहा महिने पूर्णपणे आईवर अवलंबून असल्यामुळे या कालावधीत मातेचे आरोग्य व पोषण चांगले राहणे आवश्यक असते. अपुरा आहार व गरोदरपणात घ्यावयाची काळजी याबाबत आदिवासी समाजामध्ये फारशी जागरुकता दिसून येत नाही. **या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांना अतिरिक्त पूरक चौरस आहार देण्याबाबत मा. राज्यपाल यांच्या आदेशाने दिनांक १ डिसेंबर, २०१५ पासून शासनातर्फे आदिवासी भागात १६ ह्यातील ८५ एकात्मिक बाल विकास प्रकल्पाअंतर्गत 'भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' राबवली जात आहे.**

तसेच अपुऱ्या उष्मांक व प्रथिनांमुळे आदिवासी भागातील बालकांच्या वाढीवर वाईट परिणाम होऊ नये. त्यांच्यामध्ये रक्तपांढरी, वाढ खुरटणे (स्टटिंग), उंचीच्या प्रमाणात कमी वजन (वेस्टिंग), कमी वजन (अंडरवेट) असे प्रकार होऊन ही बालके कुपोषित होऊ नयेत म्हणून **दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ या जागतिक आदिवासी दिनापासून आदिवासी भागातील ६ वर्षांपर्यंतच्या बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी या योजनेचा दुसरा टप्पा राबविण्यात येत आहे.**

अमृत आहार योजना आदिवासी विकास विभागाचा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून आदिवासी विभागाने उचलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांना पाकीटबंद आहार (टीएचआर) बंद करून शिजवलेला ताजा चौरस आहार आठवड्यातून पाच दिवस देणे आणि ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी किंवा केळी देणे हे या योजनेचे खास वैशिष्ट्य आहे. **त्यामुळे आदिवासी समाजातील स्त्रियांना व बालकांना या योजनेचा व्यवस्थित लाभ मिळावा व ही योजना अधिक चांगल्या पद्धतीने कार्यान्वित व्हावी म्हणून ग्रामसभा व विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून या योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करण्याचेही निर्देश या शासन निर्णयातून देण्यात आले आहे.**

अमृत आहार योजनेचे त्रयस्थ संस्थेमार्फत नियमितपणे मूल्यमापन करणे; **जिल्हा व राज्य स्तरावर आवश्यक तरतुदींचे नियोजन करणे**; स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सामजिक संस्था यांच्यामार्फत अमृत आहार योजनेवर देखरेख करण्यासाठी पुढाकार घेणे; एकात्मिक बाल विकास आयुक्त यांच्याकडून आलेल्या प्रस्तावित अंमलबजावणी कृती आराखड्यास व सुधारणेस मान्यता व मंजुरी देण्यासाठी राज्यपातळीवर प्रधान सचिव, आदिवासी विकास मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

अंगणवाडी सेविकांमार्फत सर्व्हे केलेल्या आदिवासी भागातील सर्व गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता, ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची अंतिम यादी एकत्रित करणे; **जिल्हा स्तरावर आवश्यक तरतुदींबाबत आढावा घेऊन त्यानुसार जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तरतुदींचे नियोजन करणे; अंगणवाड्यांमधील आहाराची तपासणी करणे**; यासाठी जिल्हा पातळीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अंमलबजावणी समितीची रचना करण्यात आली आहे. तर या योजनेची अंमलबजावणी योग्य रितीने होण्यासाठी अंगणवाडी पातळीवर अनुसूचित जमातीची महिला सरपंच वा ग्राम पंचायत सदस्य, गरोदर स्त्री, स्तन्यदा माता व अंगणवाडी सेविका यांच्या समावेशाने अमृत आहार समितीची रचना करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यात कशी आहे निधी मागणी-वितरण व्यवस्था?

अमृत आहार योजना आदिवासी विकास विभागाची असली तरी या योजनेची अंमलबजावणी एकात्मिक बाल विकास विभागामार्फत अंगणवाडीमधून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य ते अंगणवाडी पातळीवर अमृत आहार योजनेची निधी वितरणाची व मागणीची व्यवस्था काय आहे? या योजनेचे सनियंत्रण व अंमलबजावणी कशी होते? अंमलबजावणी होत असताना येणाऱ्या अडचणी, त्या सुधारण्यासाठी अंगणवाडी सेविका व स्थानिक ते राज्य स्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांच्या नेमक्या सूचना काय आहेत? या दृष्टीने दस्तऐवजीकरण करणे व त्यातून पुढे आलेल्या शिफारशी राज्य पातळीवर मांडणे, या उद्देशाने **रायगड, ठाणे, आणि गडचिरोली** या तीन जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर '**भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजने**'चा अभ्यास करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील **दिशा केंद्र**, ठाणे जिल्ह्यातील **वन निकेतन** संस्था आणि गडचिरोली जिल्ह्यातील '**आम्ही आमच्या आरोग्यासाठी**' या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने हा अभ्यास व सामाजिक अंकेक्षणाची प्रक्रिया करण्यात आली.

ठाणे जिल्ह्याची पार्श्वभूमी

जवळपास एक कोटी लोकसंख्या असलेली या जिल्ह्यात २३ लोकसंख्या ग्रामीण आहे. या ग्रामीण भागात काही क्षेत्र हे विशेष करून आदिवासी समुदायासाठी राखीव आहे. तर कुपोषण आणि उंचीच्या प्रमाणात कमी वजन (वेस्टिंग) असलेल्या ० ते ६ वयोगटातील मुलांची संख्या (NFHS-४ सर्वेक्षणानुसार) ८.९ आहे. या मुलांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी शासनाच्या पातळीवर बरेच प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ठाणे जिल्ह्यातील निवडक असलेल्या अनुसूचित क्षेत्रामध्ये अमृत आहार योजना राबवली जाते. वर म्हटल्याप्रमाणे वेगवेगळ्या पातळ्यांवर या योजनेच्या निधी व्यवस्थेसंदर्भात माहिती घेण्यासाठी पुढील व्यक्ती निवडण्यात आल्या.

राज्य ते गाव पातळीवर कोणा-कोणाकडून माहिती घेण्यात आली.



वेगवेगळ्या स्तरांवरून अमृत आहार योजनेच्या निधी वितरणाच्या, योजनेच्या अंमलबजावच्या व सनियंत्रणाच्या पद्धती समजावून घेतल्यावर पुढे आलेले निष्कर्ष जिल्हा व राज्य स्तरावर मांडणे हा या अभ्यासाचा मुख्य हेतू होता.

अभ्यासातून काय निष्कर्ष निघाले?

अ. ठाणे जिल्ह्यातील अमृत आहार योजनेची मागणी व वितरण यंत्रणेचा अभ्यास करण्यासाठी मागील तीन वर्षांची माहिती घेतली असता पुढील चित्र समोर आले.

वर्ष २०१६-१७



वर्ष २०१६-१७ या आर्थिक वर्षात अमृत आहार योजनेअंतर्गत राज्याकडून ठाणे जिल्ह्यासाठी ५ कोटी ६० लाखाचा निधी मिळाला, हा निधी मे-सप्टेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यात तालुका स्तरावर वर्ग करण्यात आला. जिल्ह्यावरून आलेला निधी तालुका स्तरावर पोचून तो आहार समितीला मिळायला साधारण दीड महिन्यांचा कालावधी लागला. उदा. १२ मे रोजी आलेला निधी

२० मे ला तालुका स्तरावर पोचतो आणि तालुक्यातून आहार समितीला २८ जून रोजी वर्ग केला जातो. त्यानंतरचा तालुका स्तरावरून आहार समितीला दिला जाणारा निधी साधारण दोन महिन्यांच्या अंतराने दिला जातो असे दिसून आले. यातही दिवाणपाडा आणि वडगाव जिथे योजनेचे लाभार्थी जास्त आहेत, तिथे अनुक्रमे सहा वेळा व पाच वेळा (साधारण दर दोन महिन्यानंतर) निधी देण्यात आला तर मिल्हे गावात जिथे तुलनेने लाभार्थी कमी आहेत तिथे पहिला निधी सप्टेंबर, ऑक्टोबर, फेब्रुवारी आणि मार्च अशा गरजेनुसार देण्यात आला. यावरून २०१६-१७ या आर्थिक वर्षात निधी जिल्हा पातळीवर २ हप्त्यात वितरित केला जाऊन त्या हप्त्यांमधील कालावधी ७ महिने इतका मोठा होता.

वर्ष २०१७-१८



वर्ष २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात राज्याकडून जून, नोव्हेंबर आणि मार्च अशा तीन टप्प्यात जिल्ह्याला निधी वर्ग करण्यात आला. जिल्ह्यावरून याच तीन महिन्यात त्याच तारखांना निधी तालुका स्तरावर पाठवण्यात आला. तारखा त्याच असल्याने हा निधी BDS प्रणाली मार्फत दिला गेला. तालुक्यावरून हा निधी कधी वितरित झाला याच्या तारखा उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. वडगाव आणि मिल्हे या दोन्ही गावांना जून महिन्यात पहिला हप्ता मिळाला, तर दिवाणपाडा येथे मात्र नोव्हेंबर महिन्यात हा निधी मिळाला असे दिसून येते. २०१६-१७ च्या तुलनेत २०१७ -१८ या आर्थिक वर्षात निधीची रक्कम ३ कोटी ९० लाखांनी वाढलेली दिसते. यावरून असे म्हणता येईल की सन २०१७-१८ मध्ये प्रत्येक पातळीवर राज्य ते जिल्हा आणि जिल्हा ते तालुका या दोन्ही पातळ्यांवर निधी वितरणाच्या दोन हप्त्यांमध्ये ४ महिन्याचा उशीर झाल्याचे दिसून आले.

वर्ष २०१८-१९

पातळी	२०१८-१९ या आर्थिक वर्षात ठाणे जिल्ह्यातील तीन/चार वेळा निधी वितरण केल्याची माहिती
राज्य ते जिल्हा	1st, 2nd, 3rd
जिल्हा ते तालुका	1st
तालुका ते बाल विकास अधिकारी	1st, 2nd
तालुकास्तर ते आहार समिती	1st, 2nd, 3rd, 4th

अडव्हान्स नाही

निधी वितरणाची माहिती नोंदवलेली नाही.

एप्रिल १८	मे १८	जून १८	जुलै १८	ऑगस्ट १८	सप्टें. १८	ऑक्टो. १८	नोव्हें. १८	डिसें. १८	जाने. १९	फेब्रु. १९	मार्च १९

वर्ष २०१८-१९ या आर्थिक वर्षात राज्याकडून जुलै, ऑक्टोबर आणि मार्च या तीन टप्प्यात जिल्ह्याला निधी मिळाला आहे. या आर्थिक वर्षात निधी ५० लाखांनी कमी झालेला दिसतो. जिल्ह्यावरून तालुका स्तरावर BDS प्रणालीमार्फत निधी त्याच तारखांना देण्यात आल्याचे दिसून येते. तालुका स्तरावर आधीच्या वर्षातील निधी शिल्लक असल्याने एप्रिल, जुलै, ऑक्टोबर आणि जानेवारी या महिन्यांमध्ये निधी वर्ग करण्यात आला.

आ. अमृत आहार योजने संदर्भातील इतर मुद्दे...

ठाणे जिल्ह्यात अमृत आहार योजनेच्या निधी वितरण आणि योजनेच्या सनियंत्रण आणि अंमलबजावणीबाबत जिल्हा ते गाव स्तरावरील शासकीय यंत्रणेकडून पुढील माहिती घेण्यात आली. **निधी संबंधित काय अडचणी आहेत? योजनेची देखरेख यंत्रणा कशी आहे? योजनेच्या अंमलबजावणीत काय अडचणी येतात? योजनेच्या अंमलबजावणीबाबत अभ्यासातून काय सूचना पुढे येत आहेत?** याबाबत माहिती घेतली असता या माहितीच्या आधारे पुढील शिफारशी समोर आल्या. या शिफारशींची जिल्हा यंत्रणेने दखल घेऊन त्यानुसार अंमलबजावणी केल्यास निश्चितच अमृत आहार योजनेचा हेतू सफल होण्यास अधिक मदत होईल.

गावस्तर / अंगणवाडी

निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी	देखरेख यंत्रणा	अंमलबजावणीतील अडचणी
▪ प्रती लाभार्थी **रु. ३५/- ही रक्कम खूप कमी वाटते.** ▪ जेवण बनवण्यासाठी लागणारे साहित्य व अंडी/केळी खरेदी यासाठी लागणारा **प्रवासखर्च मिळत नसल्याने अंगणवाडी सेविकेला आहार तयार करणे परवडत नाही.** ▪ **अंगणवाडी सेविकांना मिळणारा निधी साधारण दोन ते तीन महिन्यातून एकदा मिळतो,** त्यामुळे **त्यांना स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करावे लागत आहेत.** ▪ **समितीच्या** खात्यावर आलेला निधी काढण्यासाठी **अध्यक्षांना बँकेत घेऊन जाण्यासाठी अंगणवाडी सेविकेला स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करावे लागतात.** ▪ अंगणवाडी पातळीवर अमृत आहारासाठी आलेल्या **निधीच्या खर्चाचे तपशील, मागणीपत्र, खर्चाचे व्हाउचर्स, निधी खर्चाबाबत आहार समितीचे निर्णय आदींचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवले नसल्याचे** दिसून आले. यासंबंधी **अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण झाले नसल्याचे** दिसून आले. ▪ **अमृत आहार** समितीच्या नावे निधी येत असला व समितीच्या मान्यतेने निधी खर्च करायचा? असा नियम असला तरी या **समित्यांना याबद्दल कोणतीच कल्पना नसल्याचे व या**	▪ **अमृत आहार** योजनेच्या शासकीय परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे अंगणवाडी पातळींवर ही योजना व्यवस्थित चालण्यासाठी व तिच्यावर देखरेखीच्या हेतूने अंगणवाडी स्तरावर अमृत आहार समिती गठीत होणे आवश्यक आहे. मात्र या तिन्ही गावात **ही समिती केवळ कागदावर गठीत असल्याचे दिसून आले. समितीच्या बैठकांचे रेकॉर्डस् उपलब्ध झाले नाहीत.** ▪ या योजनेच्या योग्य अंमबजावणीसाठी याबाबत **या समित्यांचे कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण झाले नसल्याचे निदर्शनास आले.** ▪ **पर्यवेक्षिका आणि सीडीपीओ** यांनी महिन्यातून किमान **२० अंगणवाडींना भेट** देऊन अमृत आहार योजनेचा आढावा घेणे व अमृत आहाराची गुणवत्ता तपासणे आदी गोष्टी करणे अपेक्षित आहेत. पण तसे न होता अंगणवाडी सेविकांच्या दर महिन्याला होणाऱ्या बैठकांमध्येच अमृत आहार योजनेचा आढावा घेत असल्याचे	▪ अमृत आहार योजनेतून मिळणाऱ्या आहारात बऱ्याचदा भात-वरण-भाजी एवढेच पदार्थ मिळतात. **त्यात चपाती, शेंगदाणा लाडू हे फारसे मिळत नाही.** ▪ आठवड्यातून चार वेळा अंडी देणे अपेक्षित असताना **दोन दिवस अंडी आणि दोन दिवस एक केळ असे दिले जाते.** ▪ जेवण तयार करण्यासाठी देण्यात येणारे **१०००/- रुपये त्यांना अपुरे वाटतात.** ▪ सेवा देणाऱ्या **अंगणवाडी सेविका या उच्च जातीतील असल्याने अनुसूचित जाती-जमातीच्या व आदिवासी महिलांना त्यांच्याकडून आहार घेण्यामध्ये उपकाराची आणि कमीपणाची भावना आहे,** त्यामुळे बऱ्याच गरोदर आणि स्तन्यदा महिला आहार

निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी	देखरेख यंत्रणा	अंमलबजावणीतील अडचणी
समित्यांचे याबाबत तसे प्रशिक्षणही झाले नसल्याचे दिसून आले. त्यामुळे फक्त सरपंच व अंगणवाडी सेविकेच्या सहीनेच हा निधी बँकेतून काढला जातो. ▪ **योग्य प्रमाणात व वेळेवर पुरेसा निधी मिळत नसल्यामुळे** तिन्ही गावातील अंगणवाडी सेविकांना योजना राबवत असताना **अडचणी आल्या असल्याचे** दिसून आले. ▪ अंगणवाडी सेविकेच्या गैरहजेरीत अंगणवाडी मदतनीसकडून अमृत आहार योजना राबवली जात नाही.	आढळून आले. त्यामुळे गाव पातळीवर ही योजना राबवत असताना नक्की कोणत्या अडचणी येतात हे कळत नाही. ▪ तसेच शासकीय परिपत्रकानुसार **आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारीही अंगणवाडीला भेटी** देत असल्याचे आढळून आले. अमृत आहार योजनेचे **हिशोब आहार समितीने ग्रामसभेत मांडणे** आवश्यक आहे. मात्र **आहार समितीला व ग्रामसभेला याबाबत त्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या माहीत नसल्याचे** तिन्ही गावातून आढळून आले.	घेण्यासाठी अंगणवाडीत जात नाहीत. अंगणवाडी सेविकाही या कामाबाबत फारशा गंभीर दिसत नाहीत. ▪ **गरोदर व स्तन्यदा महिला अंगणवाडीमध्ये येऊन जेवत नाहीत.** ▪ ७ महिने ते ६ वर्ष वयातील मुलांना ४ दिवस अंडी मिळत नाहीत, दोन दिवस अंडी आणि दोन दिवस केळी दिली जातात. ▪ **अंगणवाडी सेविकांना योजनेच्या अंमलबजावणी-बद्दल, योजनेचा खर्च कसा ठेवावा, आहार समितीची कामे आणि त्यांची भूमिका याबद्दलचे प्रशिक्षण नाही.** ▪ आहार समित्या कार्यान्वित झालेल्या नाहीत.

तालुका स्तर

निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी	देखरेख यंत्रणा	अंमलबजावणीतील अडचणी
▪ जिल्हा स्तरावरून वेळेत व नियमित निधी वितरणात अडचणी दिसून आल्या. ▪ तालुका पातळीवरून **अमृत आहार समितींना निधी ट्रान्सफर करताना बँकेच्या पातळीवर अडचणींना सामोरे जावे लागत** असल्याचे दिसून आले. संपूर्ण तालुक्यातील अमृत आहार समितींना निधी ट्रान्सफर करण्यासाठी त्या समित्यांची RTGS साठी यादी बनविणे व मग ते ट्रान्सफर करणे हे काम वेळखाऊ असल्याने ही प्रक्रिया करण्यात **किमान**	▪ तालुका पातळीवर **अंगणवाडी सेविकांच्या मासिक बैठकांमध्ये या योजनेचा आढावा व मागणी पत्र** घेतले जाते. ▪ अंगणवाडी **सुपरवायझर यांच्याकडे असलेल्या अंगणवाडींची संख्या लक्षात घेता अंगणवाडींची नियमित देखरेख करणे त्यांना शक्य नसते.** त्यामुळे अमृत आहार योजनेच्या अंमलबजावणीची	▪ **अंगणवाडी सुपरवायझर आणि प्रकल्प अधिकारी यांची रिक्त पदे** भरली गेली तर सध्याच्या मनुष्यबळावर असलेला ताण कमी होईल. ▪ आहार समित्या कार्यान्वित झालेल्या नाहीत.

निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी	देखरेख यंत्रणा	अंमलबजावणीतील अडचणी
दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागत असल्याने अमृत आहार समित्यांना वर्ष सुरू झाल्यानंतर दोन तीन महिन्यांनंतर निधी मिळतो. ▪ तसेच सरकारी बँकांच्या कर्मचाऱ्यांना **RTGS पद्धतीने निधी ट्रान्सफर करण्याचे रितसर प्रशिक्षण नसल्यानेही या अडचणी** निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले.	फारशी देखरेख केली जात नसल्याचे दिसून आले. ▪ **अमृत आहार समितीची स्थापना आणि त्यांना प्रशिक्षण नसल्याने या समित्या कार्यरत नाहीत.** ▪ तालुका पातळीवर **एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग** या दोन विभागांमध्ये **समन्वयाचा अभाव** दिसून आला. देखरेख प्रक्रियेत आदिवासी विकास विभागाची भूमिका असली पाहिजे. ▪ **ग्रामसभा आणि सरपंच** यांचा योजनेच्या अंमलबजावणीमधील सहभाग याविषयी **त्यांना फारशी माहिती नाही.**	

जिल्हा स्तर

निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी	देखरेख यंत्रणा	अंमलबजावणीतील अडचणी
▪ राज्य पातळीवरून निधी मिळण्यात अनियमितता आढळून आली. ▪ **जिल्ह्याकरिता ११ कोटी निधीची मागणी असतानाही ९ कोटी इतकाच निधी** राज्यस्तरावरून देण्यात आला. ▪ आहार **समितीला तीन महिन्याचा आगाऊ (advance) निधी** मिळणे अपेक्षित असताना **मे ते सप्टेंबर या कालावधीत पहिला हप्ता** आहार समित्यांना मिळत असल्याचे दिसून येते.	▪ जिल्हा पातळीवर शासकीय निर्णयानुसार **जिल्हा सनियंत्रण व अंमलबजावणी समितीची स्थापना झाली नसल्याचे** दिसून आले. समितीची स्थापना करून त्यांच्या नियमित बैठकांचे आयोजन करणे. ▪ अंगणवाडी सेविकांना दिल्या जाणाऱ्या निधीचा नियमित आढावा अंगणवाडी सुपरवायझर आणि प्रकल्प अधिकारी यांनी घ्यावा, तसेच **जिल्हा स्तरावरही असा आढावा घेऊन निधीची कमतरता असल्यास ती पूर्ण करावी.**	▪ **जर तीन महिन्यांचा आगाऊ निधी आहार समितीला द्यायचा असेल** तर त्याची **मागणी** तीन महिने **अगोदर** आदिवासी विकास विभागाला **देणे आवश्यक** असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी मांडले.

योजनेच्या योग्य अंमलबजावणीसाठी आलेल्या सूचना

रिक्त पदे भरणे.

अंगणवाडी सेविका व मदतनीसची पदे तातडीने भरण्यात यावीत; सीडीपीओ यांच्याकडे असलेला कार्यभार लक्षात घेता त्यांना अमृत आहार योजनेची देखरेख करण्यासाठी कार्यक्षेत्रात भेटी देता येत नाही. तीच अडचण अंगणवाडी पर्यवेक्षिकांची आहे. तरी सीडीपीओ, पर्यवेक्षिका यांची पदे तातडीने भरण्यात यावीत; अमृत आहार बनविण्यासाठी अंगणवाडी सेविका व मदतनीसवर ताण पडतो. त्यामुळे त्या त्यांची शैक्षणिक व बिगर शैक्षणिक नियमित कामे नीट करू शकत नाही. त्यांच्यावरील हा ताण कमी व्हावा म्हणून शासकीय परिपत्रकानुसार ग्रामसभांनी महिला स्वयंपाकीची नेमणूक करावी. किंवा आहार शिजविण्याचे काम महिला बचत गटांना देण्यात यावे.

सक्षम देखरेख आणि समन्वय यंत्रणेची आवश्यकता असणे.

एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्यात समन्वय वाढल्यास येणाऱ्या अडचणी कमी होऊन योजना अधिक सफल होण्यास मदत होईल; जिल्ह्याच्या आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांना या योजनेच्या सनियंत्रण व अंमलबजावणीबद्दल पुरेशी स्पष्टता असणे आवश्यक आहे. तशी ती असल्याचे दिसून आले नाही; अंगणवाडी पर्यवेक्षकांनी तालुका पातळीवर आढावा न घेता त्यासोबत प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात जाऊन या योजनेची देखरेख करणे आढावा घेणे आवश्यक आहे; अमृत आहार समितीमार्फत गाव पातळीवर या योजनेची देखरेख न करता गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत या योजनेची देखरेख केल्यास योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होईल. यामुळे या समितीच्या मदतीने गाव पातळीवर ग्रामसभेमार्फत येणाऱ्या त्रुटी व अडथळे दूर करण्यास मदत होईल; प्रकल्प अधिकारी यांच्या जिल्हा स्तरावर अमृत आहार योजनेच्या आढावा व नियोजन बैठका नियमित स्वरूपात घेण्यात याव्यात; जिल्हा सनियंत्रण आणि गाभा समित्यांची कामे वेगवेगळी असल्याने त्यांच्या वेगवेगळ्या बैठका घेण्यात याव्यात; सीडीपीओ व अंगणवाडी पर्यवेक्षकांसोबत या योजनेचा आढावा घेण्यासाठी व योजनेच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करण्यासाठी जिल्हा स्तरावर नियमित बैठका घेण्यात याव्यात; आदिवासी विकास विभागाकडून आलेल्या सूचनांचे एकात्मिक बाल विकास विभागाने पालन करून त्याचा अनुपालन अहवाल संबंधित यंत्रणेला पाठवला पाहिजे; अमृत आहार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आहार समित्यांना कार्यान्वित करणे आणि देखरेख प्रक्रियेत ग्रामसभेला सहभागी करणे आवश्यक आहे; योजनेच्या फलनिष्पत्तीसाठी निधीच्या मागणी व वितरणासाठी कायमस्वरूपी यंत्रणा विकसित करण्यात यावी. जसे की-

अंगणवाडी ते जिल्हा पातळीवर एकात्मिक बाल विकास विभाग ते आदिवासी विकास विभाग! तालुका पातळीवर एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग या दोन विभागांमध्ये समन्वयासाठी नियमित बैठका व दोघांच्या मिळून कार्यक्षेत्रात भेटी होणे आवश्यक आहे त्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत.

निधी मागणी, वितरण आणि नियोजन योग्य पद्धतीने करण्यावर भर देणे.

प्रती व्यक्ती ३५ रुपयात आहार देणे परवडत नसल्याने या रकमेत वाढ करण्यात यावी; आर्थिक वर्षात राज्य पातळीवरून जिल्हा पातळीवर १०० टक्के निधी सुरुवातीलाच वितरित केला तर निधी वितरणातील विलंब व योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी कमी होतील; ज्यांच्या जीवावर या योजनेची अंमलबजावणी होते त्या अंगणवाडी सेविका व मदतनीसचे मानधन दरमहा देण्यात यावे; निधी हप्त्या-हप्त्याने न येता एकाच वेळी मिळाला तर अमृत आहार समित्यांनाही वर्षभराचा निधी एकाच वेळी वितरित करता येईल. त्यामुळे योजना राबवताना निधीची कमतरता भासणार नाही; सीडीपीओ यांच्या पातळीवर पुरेसा शिल्लक निधी उपलब्ध असल्यास किमान तीन महिन्यांचा आगाऊ निधी आहार समितीला वर्ग करता येईल. जेणेकरून गाव पातळीवर योजना नियमित स्वरूपात चालू राहील; अमृत प्रणालीची अंमलबजावणी करावी; निधी विनाविलंब पोचण्यासाठी कॅफोमार्फत निधी वितरणाची पद्धत बंद करून उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरून आहार समित्यांना देण्यात यावा; अंगणवाडी सेविकांनी ठेवलेल्या अमृत आहार योजनेच्या हिशोबाचे ऑडिट दरवर्षी करण्यात यावे.

अंगणवाडी सेविकांना नियमित आणि सततचे प्रशिक्षण देणे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी व निधीचा हिशोब चोख ठेवण्यासाठी अंगणवाडी सेविकांचे नियमितपणे प्रशिक्षण करणे आवश्यक आहे; अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका यांचे योजनेच्या अंमलबजावणीबाबत, जमाखर्चाच्या नोंदीचे दस्तऐवज हाताळणीबाबत नियमित प्रशिक्षण करण्यात यावे.

असे केले अमृत आहार योजनेचे सामाजिक अंकेक्षण

अमृत आहार योजना राबवत असताना ग्रामसभा व विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून या योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करण्याचे निर्देश योजनेच्या शासन निर्णयात देण्यात आले आहे. या निर्देशाचा आधार घेत गाव पातळीवर या योजनेची सद्यःस्थिती काय आहे? योजनेत ठरवल्याप्रमाणे आहार दिला जातो का? निधी वेळेवर मिळतो का? योजना राबवताना अंगणवाडी सेविकांना काय अडचणी येतात? प्रत्यक्ष लाभार्थ्याला या योजनेचा लाभ कसा मिळतो? हे तपासण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील रायगड, ठाणे आणि गडचिरोली या तिन्ही जिल्ह्यातील अनुक्रमे कर्जत, मुरबाड आणि कोरची या तीन तालुक्यातील प्रत्येकी ३ गावांमध्ये सामाजिक अंकेक्षण करण्यात आले.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात दोन उपविभागात एकात्मिक बाल विकास विभागाचे काम चालते. त्यानुसार मुरबाड प्रकल्प दोनमधील लोकसंख्या ६७,३४० असून १६६ अंगणवाड्या आणि मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत. संपूर्ण मुरबाड तालुक्यात अमृत आहार योजना राबवली जाते. सामाजिक अंकेक्षणासाठी दिवाणपाडा, वडगाव आणि मिल्हे या गावांची निवड करण्यात आली. या तिन्ही गावातून गावसभा घेत अमृत आहार योजनेविषयी जाणीवजागृती व सोशल ऑडिटचे महत्त्व गावकऱ्यांना पटवून देण्यात आले. गावात ग्रामसभा घेऊन सोशल ऑडिट करण्यासाठी ग्रामसभांचे ठराव घेण्यात आले.

कोणी केले अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट?

- ठाणे जिल्ह्यात मुरबाड आणि शहापूर तालुक्यात गेल्या तीस वर्षापासून कार्यरत असणाऱ्या श्रमिक मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांचा तालुका पातळीवर सक्रिय गट कार्यरत आहे. पेसा कायद्याअंतर्गत ग्रामसभांनी शासकीय योजनांचे सोशल ऑडिट करण्याच्या अधिकाराचा वापर करून **अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट** करण्यासाठी पुढाकार घेतला.
- तालुक्यातील आदिवासी गावांपैकी दिवाणपाडा, वडगाव आणि मिल्हे या तीनही गावांमध्ये कार्यकर्त्यांचा सामाजिक अंकेक्षण गट तयार केला. गावांची प्रायोगिक तत्त्वावर अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट करण्यासाठी निवड केली.
- या तीन गावातील ग्रामसभेचे सभासद असलेल्या तरुण युवक-युवतींना घेऊन गाव गटाची बांधणी केली. या गाव गटात किमान पाच ते सात सदस्य घेण्यात आले.
- तालुक्यातील संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि वननिकेतन संस्थेच्या कार्यकर्त्यांनी या सोशल ऑडिट गटाचे मार्गदर्शक म्हणून भूमिका पार पडली.

सोशल ऑडिट प्रक्रिया करण्यासाठी गटाचे प्रशिक्षण

या तिन्ही गावातील गटांना एकत्र करून अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट कसे व का करायचे? याबबत दोन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात पुढील गोष्टींवर भर देण्यात आला...

- अमृत आहार योजना नक्की काय आहे? योजनेचा हेतू काय आहे? या योजनेचे लाभार्थी कोण आहेत? या योजनेत काय तरतुदी आहेत? योजनेची अंमलबजावणी करण्यासाठीची जबाबदार यंत्रणा काय आहे?
- अमृत आहार योजनेच्या शासकीय माहितीचे संकलन कसे व कोणाकडून करायचे? योजनेची जाणीवजागृती कशी करायची?
- शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून गावगटाला जी माहिती घ्यायची आहे, त्या माहितीचे स्वरूप कोणत्या प्रकारचे असेल? त्याचे फॉरमॅट समजून सांगणे.
- मिळालेल्या माहितीची पडताळणी कोणी व कशी करायची? पडताळणीचा हेतू काय?
- पडताळणीतून पुढे आलेल्या मुद्द्यांच्या निराकरणासाठी जनसंवादाचे आयोजन आणि पाठपुरावा कसा करायचा?
- निवडलेल्या गावांमध्ये प्रत्यक्ष सोशल ऑडिट घडवून आणण्यासाठीचे नियोजन करणे.

असे केले अमृत आहार योजनेच्या माहितीचे संकलन व जाणीवजागृती

- मुरबाड तालुक्यात आदिवासी लोकांना त्यांच्या भाषेत व सोप्या पद्धतीने अमृत आहार योजनेची माहिती कळावी आणि त्या माहितीच्या आधारे त्यांनी सोशल ऑडिटच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे या दृष्टीने पोस्टर बनवून या तिन्ही गावात गावसभा घेऊन लोकांमध्ये जाणीवजागृती करण्यात आली.

- अमृत आहार योजनेची तपशीलवार माहिती घेण्यासाठी फॉरमॅट तयार करून गावगटांना देण्यात आले. या फॉरमॅटच्या आधारे गाव पातळीवर अंगणवाडी सेविकांकडून माहिती संकलित करण्यात आली. कोणतेही आढेवेढे न घेता अंगणवाडी सेविकांनी माहिती तर दिलीच शिवाय माहिती घेते वेळी त्यांना निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी दुरुस्त करण्याची जबाबदारीही त्यांनी घेतली.
- अमृत आहार योजनेच्या लाभार्थ्यांचे रजिस्टर, जमा खर्चाच्या नोंदी, बँकेचे पासबुक, मागणी पत्र, लाभार्थी हजेरी पट, अमृत आहार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, आहार रजिस्टर व लाभार्थ्यांची यादी झेरॉक्स करून घेण्यात आली.
- मे, ऑक्टोबर आणि डिसेंबर २०१९ या तीन महिन्यातील अमृत आहार योजनेचा लाभ घेतलेल्या गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांची यादी, तर ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील मुलांच्या रजिस्टरची झेरॉक्स घेण्यात आली. माहितीच्या सत्यतेसाठी त्यावर अंगणवाडी सेविकेची सही व शिक्का घेण्यात आला.
- एप्रिल ते डिसेंबर २०१९ या कालावधीतील अंगणवाडीमधील अमृत आहार समितीच्या बैठकीचा अहवाल, अमृत आहार समिती तपासणी, नोंदवहीतील टिपण यांचीही पडताळणीसाठी झेरॉक्स घेण्यात आली.
- सामाजिक अंकेक्षण गट व संस्थेचे कार्यकर्ते यांनी सर्व प्रथम संकलित केलेली माहिती आधी स्वतः समजून घेतली. त्यातून पुढे आले मुद्दे नोंदवून घेतले. त्यानंतर गावात बैठक घेऊन पडताळणीचे नियोजन केले.

अशी केली पडताळणी

- सामाजिक अंकेक्षणाचा पुढचा आणि महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे मिळालेल्या माहितीची पडताळणी करणे. ही पडताळणी निरपेक्षपणे व्हावी म्हणून, सामाजिक अंकेक्षण गट व संस्थेचे कार्यकर्ते यांनी सर्व प्रथम संकलित केलेली माहिती आधी स्वतः समजून घेतली. त्यातून पुढे आलेले मुद्दे नोंदवून घेतले. त्यानंतर गावात गावसभा घेऊन पडताळणीचे नियोजन केले.
- दिवाणपाडा, वडगाव आणि मिल्हे या तिन्ही गावगटातील सदस्य या तिन्ही गावात जाऊन पडताळणी करतील आणि त्या त्या ग्रामसभेने या गावगटांना सहकार्य करण्याचा ठराव तिन्ही गावांमधून घेण्यात आला.
- त्यानुसार लाभार्थ्यांच्या यादीप्रमाणे गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांच्या (लाभार्थ्यांच्या) घरी जाऊन, अंगणवाडी सेविकेने सांगितलेली माहिती गावगटाने पडताळून पाहिली.
- अमृत आहाराची गुणवत्ता कशी असते? आहाराचा दर्जा कसा असतो? शासकीय परिपत्रकात ठरवून दिल्यानुसार आहार नियमित स्वरूपात मिळतो का? (हिरवी भाजी, पोळी/ भाकरी, डाळ-भात, अंडी किंवा केळी, शेंगदाणा लाडू, लिंबाची फोड), आहाराविषयी काही तक्रारी आहेत का? अंगणवाडी सेविकेला आहार देताना काय अडचणी येतात? अंगणवाडीला येणाऱ्या अडचणी / निधीबद्दल गावात किंवा ग्रामसभेत चर्चा केली जाते का? अमृत आहार योजनेअंतर्गत अंगणवाडीमध्ये आहार समितीच्या बैठका नियमित होतात का? आदी माहितीची पडताळणी गरोदर स्त्री व स्तन्यदा मातांशी बोलून करण्यात आली.

- सोबतच ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांच्या पालकांची बैठक घेऊन बालकांना आठवड्यातून किती दिवस अंडी/केळी दिली जातात? याची पडताळणी केली.
- निधीचा अभाव, निधी वेळेत न मिळणे यामुळे अमृत आहार देण्यावर काही परिणाम होतोय का? याची माहिती घेण्यासाठी अंगणवाडी सेविका, अमृत आहार समिती सदस्य यांच्याही पडताळणीच्या वेळी मुलाखती घेतल्या.
- अंगणवाडीत प्रत्यक्ष जाऊन अमृत आहार बनविण्याची जागा, शिधा ठेवण्याची जागा, आहार बनविण्याची पद्धत याची तपासणी केली.
- पडताळणीच्या शेवटी अंगणवाडीतून मिळालेली अमृत आहार योजनेची शासकीय माहिती, पडताळणीतून दिसून आलेल्या तफावती, लाभार्थींनी सांगितलेल्या अडचणी, अंगणवाडी सेविकांनी मांडलेल्या अडचणी, नव्याने समोर आलेले मुद्दे यांची नोंद गावगटाने करून ठेवली.
- वरवर पाहता सुरळीत चाललेल्या अमृत आहार योजनांच्या अंतरंगात किती समस्या आहेत? हे पडताळणीच्या प्रक्रियेतून प्रकर्षाने पुढे आले.

गाव जनसुनवाई

- अमृत आहार योजनेच्या माहितीची प्रत्यक्ष लाभार्थ्यांना भेटून पडताळणी झाल्यावर पडताळणीतून पुढे आलले मुद्दे सोडविण्यासाठी या तिन्ही गावात ग्रामसभेमार्फत जनसंवाद आयोजित करण्यात आला.
- या जनसंवादात संबंधित सरकारी अधिकारी उपस्थित राहतील यासाठी पाठपुरावा करण्यात आला. प्रत्यक्ष जनसंवादाच्या वेळी सादर करायची माहिती व अहवाल तयार करण्यात आले.
- गावातील समस्या व त्याविषयीच्या मागण्या यांचा माहितीफलक कार्यक्रमाच्या ठिकाणी लावण्यात आला.
- अमृत आहार योजनेची माहिती देऊन पडताळणीतून उपस्थित झालेले मुद्दे या जनसंवादात चर्चिले गेले. जे मुद्दे गाव पातळीवर सुटणारे होते त्यावर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. तर धोरणात्मक निर्णयांसाठी तालुका व जिल्हा पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्याचे ठरले.

सोशल ऑडिटच्या पडताळणीतून पुढे आलेले सकारात्मक मुद्दे

- तिन्ही गावात अमृत आहार योजना निधीचा अभाव असूनही सुरू असल्याचे दिसून आले.
- महिला आहार नेण्यासाठी अंगणवाडीत आल्या नाहीत तरी अंगणवाडी सेविका व मदतनीस आहार महिलांना घरपोच देत असल्याचे दिसून आले.
- ज्या स्त्रिया किंवा बालकेअंडी खात नाही त्यांना केळी दिली जातात.
- तिन्ही गावात गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांना महिन्यातून २५ दिवस तर ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना १६ दिवस अंडी / केळी नियमित मिळतात.

गाव पातळीवरील पडताळणीतून पुढे आलेल्या समस्या

- तिन्ही गावात **अमृत आहार समिती गठीत झाली असल्याचा ठराव उपलब्ध नसून समितीचे रजिस्टर, आहार तपासणी रजिस्टर व चव रजिस्टर उपलब्ध नाहीत.** आहार समिती सक्रिय नसल्यामुळे समितीच्या बैठका होत नाहीत. अमृत आहाराबद्दलच्या **नोंदी व्यवस्थित होत नसल्याचे** आढळून आले.
- आहारात भात, डाळ आणि भाजी हे पदार्थ जास्त असतात. **चपाती कधी-कधी दिली जाते, एकच चपाती दिली जाते.**
- **महिला आणि मुलांना आठवड्यातून दोनदा अंडी व दोनदा केळी दिली जातात.** (महिलेला सहाही दिवस अंडी/ केळी मिळणे अपेक्षित आहे)
- **मिल्हे गावातील कातकरी वस्तीवर अमृत आहार योजना दिली जात नसल्याचे दिसून आले.** या वस्तीवर ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील १२ मुले आहेत असे निदर्शनास आले. या मुलांना अमृत आहार योजनेतून अंडी व केळी दिली जातील असे अंगणवाडी सेविकेने मान्य केले. त्यासाठी मदतनीस या मुलांना आहार आणून देईल.
- तिन्ही **गावात अमृत आहार समितीबद्दल फारशी माहिती नसल्यामुळे** गावात या समितीबद्दल कधी चर्चा झाली नाही. **आहार समितीचे हिशोब तपासले गेले नाहीत.**

पडताळणीतून आलेल्या मुद्यांबद्दल गाव जनसंवादात झाले निर्णय

- **महिलांच्या आहारात भात, डाळ, भाजी, दोन चपात्या, अंडी/ केळी, शेंगदाण्याचा लाडू आणि लिंबाची फोड असे दिले जाईल असे ठरवण्यात आले.**
- तिन्ही गावात ग्रामसभेमार्फत **अमृत आहार समिती स्थापन झाल्याचा ठराव करून घेणे.** आहार समितीच्या **नियमित बैठका घेणे.**
- तिन्ही गावातील अंगणवाडीत अमृत आहार समितीचे रजिस्टर व चव **रजिस्टर तयार करणे. आहार समितीने वेळोवेळी आहाराची गुणवत्ता व चव तपासणे.**
- **सर्व गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांनी अंगणवाडीत येऊनच आहार खावा यासाठी गावच्या बैठकीत चर्चा करण्याचे ठरले,** या महिला एकत्र आल्यास त्यांना गरोदरपणातील काळजी, बाळाची काळजी, स्तन्यपान, चौरस आहाराचे महत्त्व आदी गोष्टींबद्दल समुपदेशन व मार्गदर्शन करता येईल.

तालुका पातळीवर जनसंवाद आयोजित करून त्यात पुढील मुद्यांवर तालुका व जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून निर्णय घेण्यात येतील.

- **अमृत आहारात शासकीय परिपत्रकानुसार** जास्तीत जास्त प्रमाणात **स्थानिक आहाराचा समावेश** करणे.
- **गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत अमृत आहार योजनेवर देखरेख** ठेवणे.
- पेसा निधी अंतर्गत जेवण बनवण्यासाठी **गावातील स्वयंपाकी महिलेची नेमणूक करणे/ बचतगटामार्फत आहार तयार** करून वाटप करणे.
- **अंगणवाडी सेविकांना ३५ रुपयांमध्ये हा आहार देणे परवडत नाही,** त्यामुळे ही रक्कम वाढवली पाहिजे, कमी रकमेमुळे आहाराच्या गुणवत्तेवर परिणाम होतो, शिवाय ही बाब जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना मान्य असल्याने योजनेची अंमलबजावणी आणि तिची देखरेख याबाबत त्यांच्या भूमिकेत शिथिलता दिसते. शिवाय **निधी बराच उशिरा आल्याने अंगणवाडी सेविकांना स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करावे लागतात.**
- **अंगणवाडी सेविकांची / सुपरवायझर आणि CDPO यांची रिक्तपदे** हा भरली जावीत यासाठी प्रयत्न करणे.
- योजनेच्या अंमलबजावणी सोबतच **अंगणवाडी सेविकेंच्या देखरेखीची जबाबदारी कोणाची याबद्दल एकात्मिक बाल विकास विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांच्यात संभ्रम आहे.**
- **बिगर आदिवासी समाजातील महिलेकडून जेवण घेताना आदिवासी महिलांना संकोच वाटतो, या मुद्यामागील सामाजिक उतरंडीचा विचार करून त्यावर पर्याय शोधणे आवश्यक आहे.**

Support for Advocacy & Training to Health Initiatives
साथी

- प्रकाशक : साथी
  फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस सोसायटी,
  डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८
- फोन : ०२०-२५४७२३२५/२५४७३५६५
- ई-मेल : sathicehat@gmail.com
- वेबसाईट : www.sathicehat.org
- प्रकाशन : जून २०२०